# सहसंचालक तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय,नागपूर.

नागपूर विभाग शासकीय तंत्रनिकेतन परिसर, सदर, नागपूर

दुरध्वनी क्र. ०७१२– २५५७२६६ फॅक्स क्र. ०७१२–२५६१६६३

E-mail : ronagpur@dtemaharashtra.gov.in Website : rdtenagpur.org.in

क्रमांक : तंशिस/विकाना/ईबीसी/२०१८/ 2654

दि. 6 AUG 2018

प्रति,
प्राचार्य/संचालक,
शासकीय, शासन अनुदानित ,
विनाअनुदानित आणि कायम विनाअनुदानित महाविद्यालये/तंत्रनिकेतन संस्था,
नागपूर विभाग,
नागपूर.

विषय:— शैक्षणिक वर्ष २०१८—२०१९ मध्ये राजर्षी छत्रपती शाहू महाराज शिक्षण शुल्क शिष्यवृत्ती योजना व डॉ.पंजाबराव देशमुख वसतीगृह निर्वाह भत्ता या दोन योजनांची प्रभावी अंमलबजावणी बाबत.

संदर्भ:— १) म.शा.उच्च व तंत्रशिक्षण विभाग , मंत्रालय,मुंबई यांचे शा.निर्णय क्र. संकिर्ण—२०१८/प्र.क्र.२४९/१८/तांशि—४ , दि. १३जूलै २०१८.

२) म.शा.उच्च व तंत्रशिक्षण विभाग , मंत्रालय,मुंबई यांचे शा.निर्णय क्र. संकिर्ण—२०१८/प्र.क्र.२८५/तांशि—४ , दि. २ ऑगस्ट २०१८.

उपरोक्त विषयाच्या अनुषंगान कळविण्यांत येते की, शैक्षणिक वर्ष २०१८—२०१९ मध्ये **राजर्षी छत्रपती शाहू महाराज शिक्षण शुल्क शिष्यवृत्ती योजना व डॉ.पंजाबराव देशमुख वसतीगृह निर्वाह भत्ता या दोन** योजनांची प्रभावी अंमलबजावणी करण्यांबाबत सर्व संस्थांना दि. ०४ ऑगस्ट २०१८ रोजीच्या बैठकीत मा.जिल्हाधिकारी व मा. सहसंचालक, तंत्रशिक्षण विभागिय कार्यालय यांनी शासनाच्या वतीने राबविण्यांत येणाऱ्या सदर योजनांबाबत मार्गदर्शन केले. सदर योजनांची माहिती संस्थेतील सर्व विद्यार्थ्याच्या निदर्शनास येईल अशा दर्शनीय स्थळी सूचना फलकावर सूचना लावण्यांत याव्या. संस्थेकडून विद्यार्थ्यांना/ पालकांना वेळोवेळी सदर योजनांबाबत मार्गदर्शन करावे.

विद्यार्थ्यांना शैक्षणिक वर्ष २०१८—२०१९ मध्ये **राजर्षी छत्रपती शाहू महाराज शिक्षण शुल्क शिष्यवृत्ती योजना व डॉ.पंजाबराव देशमुख वसतीगृह निर्वाह भत्ता या दोन** योजनेचे अर्ज महा—डीबीटी या पोर्टलवर ऑन—लाईन पध्दतीने भरावयाचे आहे. तरी सर्व संस्थाना सूचीत करण्यांत येते की, त्यांनी विद्यार्थ्यांना ऑन—लाईन ची सुविधा संस्थेतच उपलब्ध करुन दयावी. तसेच विद्यार्थ्यांना ऑन—लाईन अर्ज भरतांना येणाऱ्या अडचणींचे निराकरण करण्यांकरिता एक अधिकारी व संबंधित कर्मचारी यांना नियुक्त करावे. जेणे करुन विद्यार्थ्यांना अर्ज भरतांना कुठल्याही अडचणी येणार नाहीत.

तसेच शासना तर्फे राबविण्यांत येणाऱ्या सदर योजनांपासून विद्यार्थी वंचित राहणार नाही, याची कृपया प्राचार्यांनी दक्षता घ्यावी. शैक्षणिक वर्ष २०१८—२०१९ मध्ये आर्थिक दृष्टया मागासवर्गीय विद्यार्थ्याकरिता मोठया प्रमाणात राबविण्यांत येणाऱ्या **राजर्षी छत्रपती शाहू महाराज शिक्षण शुल्क शिष्यवृत्ती योजना व डॉ.पंजाबराव देशमुख वसतीगृह निर्वाह भत्ता या दोन** योजनां यशस्वी रित्या पार पाडण्यांकरिता सर्व संस्थाप्रमुखांनी योग्य ते मार्गदर्शन विद्यार्थ्यांना करावे. व याबाबत कोणत्याही विद्यार्थ्याची तक्रार या कार्यालयास येणार नाही याची काळजी घ्यावी.

( गुलाबराव ठाकरे )
सहसंचालक
तंत्रशिक्षण विभागिय कार्यालय,
नागपूर.

प्रत:— १. सर्व मा.जिल्हाधिकारी कार्यालय, यांना महितीकरिता मानार्थ सादर.
२. मा.संचालक, तंत्रशिक्षण संचालनालय, म.रा. मुंबई यांना माहितीकरिता मानार्थ सादर.